# हिंजवडी पोलीस ठाणे,पिंपरी चिंचवड
# प्रेसनोट ता. ३०/०९/२०२२

## *अपघाताचा बनाव करून जबरी चोरी करण्याऱ्या गुन्हेगारांना हिंजवडी पोलीसांकडुन अटक*

दिनांक ११/०८/२०२२ रोजी १९/१५ ते २०/२० चे दरम्यान फिर्यादी नामे-पराग प्रकाश रस्तोगी वय- ४७ वर्षे, धदा नोकरी, रा. अे/११०२ आयशा झेनेथ शनी मंदीर रोड ताथवडे पुणे हे ऑर्चिड हॉटेल, बाणेर बेंगलोर मुंबई हायवे पुणे येथुन दुचाकी गाडीवरून जात असताना दोन अज्ञात इसम मोपेड गाडीवरुन येवून "तेरी वजह से मेरे पैर मे चोट आई हे, और मेरा मोबाईल भी गिरके बंद हुआ है" असे बोलुन गाडीस डॅश लागला असा बहाणा करून जबरदस्ती करून कॉलर पकडुन वाईट वाईट शिवीगाळ करून मारहाण करण्याची धमकी देवून जबरदस्तीने ७०००/-रु घेवून गेले म्हणुन अज्ञात इसमांविरूध्द तक्रार दिल्याने हिंजवडी पोलीस ठाणेस भा.द.वि. कलम ३९२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास करीत असताना हिंजवडी पोलीस स्टेशन डी.बी.पथकातील पो.कॉ.कांबळे ब नं २४०१ यांना बातमी मिळाली की, दोन इसम हे अपघाताचा बनाव करून लोकांना धमकी देऊन त्यांच्याकडून जबरदस्तीने पैसे घेत आहेत, त्याप्रमाणे डी.बी. पथकाने १) साहील संजय मराठे वय-२१ वर्षे धंदा-शेती,रा. भुकूम सेल पेट्रोलपंपाचे मागे ता. मुळशी जि. पुणे २) हर्षल सुनील गोळे वय-२० वर्षे रा. पिरंगुट ता. मुळशी जि. पुणे या दोन इसमांना संशयावरून ताबेत घेवून त्यांना विश्वासात घेवून वरील गुन्हयांबाबत विचारपुस केली असता त्यांनी वरील गुन्हा केल्याचे कबुल केले असून मौज मजेसाठी सदरचा गुन्हा केला असल्याचे सांगीतले. त्यानंतर सदर आरोपी यांच्याकडे आणखीन सखोल चौकशी केली असता त्यांनी दोन महिन्यापुर्वी सुसखिंड सुसरोड हॉटेल नंदिनी समोर पुणे या ठिकाणी तीनचाकी टेम्पो चालक यांस हाताने मारहाण करुन रोख रक्कम व सोन्याची चैन हे जबरदस्तीने चोरी केली असल्याचे सांगीतले त्याप्रमाणे अभिलेख तपासला असता नामे-अजित पांडुरंग भसाळे वय ४५ वर्षे धंदा- भाजीपाला व्रिकी रा. स्वप्नशिल सोसायटी फलॅट नं ३०४ तीसरा मजला एच पी पेट्रोल पंपाचे मागे सुसगाव ता मुळशी जि पुणे हे त्यांच्या घरी जात असताना अनोळखी तीन इसम मोपेड गाडीवरून पाठीमाघून येऊन तुम्ही माझ्या गाडीला कट का मारली त्यामुळे माझा मोबाईल खाली पडला व त्यावरून तुझी गाडी गेली व माझा मोबाईल फुटला असे बोलून मला खाली उतरवून मला मारहाण करून करून जबरदस्तीने गळयातील १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन काढून घेतल्याने

अज्ञात आरोपी यांच्याविरूध्द तक्रार दिल्याने हिंजवडी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं.५६६/२०२२ भादवी कलम ३९२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. तपासात आरोपी यांच्याकडून १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जप्त केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक राम गोमारे हिंजवडी पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा.श्री.अंकुश शिंदे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. डॉ संजय शिंदे सो, अप्पर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. आनंद भोईटे, पोलीस उप आयुक्त परि. २, पिंपरी चिंचवड मा.श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त, वाकड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ.विवेक मुगळीकर, सुनिल दहिफळे, सोन्याबापु देशमुख पोलीस निरीक्षक (गुन्हे), तपास पथकाचे प्रमुख सपोनि, सागर काटे, सपोनि राम गोमारे, सपोफौ बंडु मारणे, बाळकृष्ण शिंदे, पो.हवा. कैलास केंगले, योगेश शिंदे, बापु धुमाळ, विक्रम कुदळ, पोना रितेश कोळी, अरूण नरळे, चंद्रकांत गडदे, श्रीकांत चव्हाण, कारभारी पालवे, ओमप्रकाश कांबळे, अमर राणे, दत्ता शिंदे, सुभाष गुरव तसेच पोलीस उप आयुक्त परि. २ यांचे कार्यालयातील पोउनि रमेश पवार, पो.शि. पंडीत यांनी केली आहे.

-------oooo-------